सकाळ

शनिवार
७ मे २०२२



चंदगड : श्रीमती तुपारे यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना एम. एल. चौगुले, प्रा. व्ही. के. मायदेव, डी. के. मायदेव, पुष्पा नेसरीकर, गुरुनाथ काणेकर.

# मयत कर्जदाराच्या वारसाला 'रवळनाथ'तर्फे मदतीचा धनादेश

चंदगड, ता. ६ : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील शाखेतर्फे मृत कर्जदार सभासद विठ्ठल गोपाळ तुपारे (रा. मजरे कार्वे, ता. चंदगड) यांच्या वारसांना १२ लाख ६० हजार रुपयांची मदत करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, शाखाध्यक्षा पुष्पा नेसरीकर, नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे सीनिअर डिव्हिजन मॅनेजर अविनाश कांबळे, शरद टोपले यांच्या उपस्थितीत तुपारे यांच्या पत्नीकडे रकमेचा धनादेश प्रदान करण्यात आला.

संस्थेने तुपारे यांना ५ जून २०१३ ला घर बांधकामासाठी १२ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले होते. त्या वेळी 'रवळनाथ'च्या व्यवस्थापनाकडून त्यांना अपघात विमा पॉलिसी घेण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार त्यांनी ही पॉलिसी घेतली होती. त्यानुसार कंपनीकडून १२ लाख आणि रवळनाथ संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून ६० हजार रुपये असा १२ लाख ६० हजार रुपयांचा धनादेश श्रीमती तुपारे यांच्याकडे देण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, शाखा सल्लागार गुरुनाथ काणेकर, नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे असिस्टंट मॅनेजर शामराव माने, नीलेश शेटे, शरद टोपले, शाखाधिकारी दीपक शिंदे उपस्थित होते. 'सीईओ' डी. के. मायदेव यांनी आभार मानले.